आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
३१ जुलै २०२४ - बुधवार

**ठळक बातम्या**

- बुलेट रेल्वे प्रकल्पाचं काम वेगाने पुढे जात असल्याची रेल्वेमंत्र्यांची लोकसभेत ग्वाही
- जातनिहाय जनगणनेच्या मागणीवरुन लोकसभेत गदारोळ
- देशातल्या नवनियुक्त राज्यपालांचा शपथविधी
- केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या अध्यक्षपदी माजी केंद्रीय आरोग्य सचिव प्रीती सुदन यांची नियुक्ती
- हमासचा राजकीय प्रमुख इस्माइल हानिये याची इराणमधे हत्या

**आणि**

- केरळमधे वायनाड इथल्या दुर्घटनेत मृतांची संख्या १५७, बचाव कार्य अद्याप सुरु

**<><><><><>**

बुलेट रेल्वे प्रकल्पाचं काम वेगाने पुढे जात असल्याची ग्वाही रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी लोकसभेत दिली आहे. या प्रकल्पाचा एक भाग म्हणून देशात पहिल्यांदाच समुद्राच्या खाली ३० मीटरवर २१ किलोमीटरचा बोगदा बांधला जात असल्याची माहिती प्रश्नोत्तराच्या तासाला पुरवणी प्रश्नांना उत्तरादाखल वैष्णव यांनी दिली. मेट्रो प्रकल्पासाठीचं ३२० किलोमीटर

पायाबांधणीचं काम पूर्ण झालं असून मेट्रो हा तंत्रज्ञानाभिमुख प्रकल्प असल्याचंही ते म्हणाले.

संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात आज लोकसभेच्या कामकाजाला सुरुवात होताच जातनिहाय जनगणना करण्याच्या मागणीवरून विरोधकांनी गदारोळ केल्यानं लोकसभेचं कामकाज १२ वाजेपर्यंत तहकूब करण्यात आलं होतं. कामकाजाला पुन्हा सुरुवात होताच प्रश्नोत्तरांचा तास पुकारण्यात आला.

**<><><><><>**

महाराष्ट्राचे नवनियुक्त राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांचा शपथविधी समारंभ आज संध्याकाळी साडे सहा वाजता राजभवनात होणार आहे. सी. पी. राधाकृष्णन हे झारखंडचे राज्यपाल होते. काल मावळते राज्यपाल रमेश बैस यांना राजभवनात आयोजित समारंभात निरोप देण्यात आला.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी २८ जुलै रोजी विविध राज्यांमध्ये राज्यपालांची नियुक्ती केली होती. त्यापैकी काही राज्यपालांनी शपथ घेतली असून काहींचा शपथविधी सोहळा आज संध्याकाळी होणार आहे.

लक्ष्मण प्रसाद आचार्य यांनी आज मणिपूरचे राज्यपाल म्हणून शपथ घेतली. आज सकाळी इंफाळ येथील राजभवनात शपथविधी सोहळा पार पडला. तर गुलाबचंद कटारिया यांनी आज पंजाबचे राज्यपाल आणि चंदिगडचे प्रशासक म्हणून शपथ घेतली. आज सकाळी पंजाबच्या राजभवनात हा सोहळा झाला. माजी केंद्रीय मंत्री संतोष गंगवार यांनी देखील आज सकाळी झारखंडचे राज्यपाल म्हणून शपथ घेतली.

**महाराष्ट्र** विधानसभेचे माजी अध्यक्ष हरिभाऊ बागडे यांची राजस्थानचे राज्यपाल म्हणून नियुक्ती झाली आहे. राजस्थानचे मुख्यमंत्री

भजनलाल शर्मा यांनी आज त्यांची औपचारिक भेट घेतली. आज संध्याकाळी हरिभाऊ बागडे यांचा राज्यपाल पदाचा शपथविधी होणार आहे.

<><><><>

केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या अध्यक्षपदी माजी केंद्रीय आरोग्य सचिव प्रीती सुदन यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्या भारतीय प्रशासकीय सेवेच्या १९८३मधल्या तुकडीतल्या अधिकारी आहेत. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी सुदन यांच्या नियुक्तीला मंजुरी दिली. उद्यापासून प्रीती सुदन पदभार स्वीकारतील. केंद्रीय लोकसेवा आयोगाचे याआधीचे अध्यक्ष डॉ. मनोज सोनी यांनी कार्यकाळ पूर्ण होण्यापूर्वीच या महिन्यात पदाचा राजीनामा दिला होता.

<><><><>

आंतरराष्ट्रीय सहकार्य आणि क्षमता वाढीद्वारे देशाच्या संस्कृती आणि वारसा जतन करण्यासाठी सरकारच्या प्रयत्नांचं कौतुक पर्यटन आणि सांस्कृतिक मंत्री गजेंद्रसिंह शेखावत यांनी केलं आहे. भारतीय पर्यटन स्थळांचा वारसा यादीत समावेश करण्यासाठी सरकार प्रयत्नशील असल्याचं ते दिल्लीत वार्ताहरांशी बोलताना म्हणाले. गेल्या दहा वर्षांत देशातल्या १३ स्थळांचा वारसा यादीत समावेश केल्याचं त्यांनी सांगितलं.

<><><><>

शिवसेना संसदीय पक्षाच्या उपनेतेपदी खासदार धैर्यशील माने यांची निवड करण्यात आली आहे. त्यांच्या निवडीचं पत्र शिवसेनेचे प्रमुख नेते मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी लोकसभा सभापतींना सादर केलं. धैर्यशील माने हे महाराष्ट्रातल्या हातकणंगले मतदार संघातून सलग दुसऱ्यांदा खासदार म्हणून निवडून आले आहेत.

**<><><><><>**

भारताचे सौदी अरेबियामधले राजदूत डॉ. सुहेल खान यांच्या नेतृत्वाखालच्या शिष्टमंडळाने सौदी अरेबियातल्या सामरिकदृष्ट्या महत्वाच्या असलेल्या ताबुक प्रांताला भेट दिली. राजकीय संपर्क आणि आंतरराष्ट्रीय भागीदारी वाढवण्याचा या भेटीचा हेतू आहे. खान यांनी ताबुक प्रांताचे गव्हर्नर फहद बिन सुल्तान बिन अब्दुल अजीज अल सौद यांची भेट घेतली. भारत आणि ताबुक यांच्यातले संबंध दृढ करणं तसंच व्यावसायिक करारांविषयी यावेळी दोघांमध्ये चर्चा झाली. भारत, मध्य पूर्व आशिया आणि युरोप कॅरीडॉरमध्ये ताबुकचं स्थान महत्वाचं असल्याचं खान म्हणाले.

**<><><><><>**

व्हिएतनामचे प्रधानमंत्री फाम चिन्ह तीन दिवसांच्या भारत भेटीसाठी नवी दिल्लीत दाखल झाले आहेत. त्यांच्या समवेत असलेल्या शिष्टमंडळात अनेक मंत्री, उपमंत्री आणि व्यापारी नेत्यांचा समावेश आहे. त्यांच्या या भेटीमुळे दोन्ही देशांमधली सर्वसमावेशक धोरणात्मक भागीदारी आणखी मजबूत होईल असं परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी म्हटलं आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्याशी ते द्विपक्षीय चर्चा करणार असून राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांचीही भेट घेणार आहेत. भारत आणि व्हिएतनाम यांच्यात दीर्घकालीन ऐतिहासिक संबंध असून मोदी यांच्या भेटी दरम्यान त्याना धोरणात्मक भागीदारीचं स्वरूप देण्यात आलं होतं.

**<><><><><>**

हमासचा राजकीय प्रमुख इस्माइल हानिये याची इराणची राजधानी तेहरानमध्ये हत्या झाली. इराणचे अध्यक्ष मसौद पेझेश्कियान यांच्या शपथविधी समारंभासाठी इस्माइल हानिये तेहरानला आला असताना त्याच्या घरी एका अंगरक्षकासह त्याला ठार करण्यात आल्याची माहिती इराणच्या 'इस्लामिक रेव्होल्युशनरी गार्ड कोअर'नं दिली आहे. याबद्दल अधिक तपशील देण्यात आलेले नाहीत. हानिये हा हमासचा मुख्य चेहरा होता आणि अनेक शांतता चर्चांमध्ये तो सहभागी होता.

<><><><>

दिल्ली उत्पादन शुल्क घोटाळ्याशी संबंधित अटकेत असलेले दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल, माजी उपमुख्यमंत्री मनीष सिसोदिया आणि भारत राष्ट्र समिती पक्षाच्या के. कविता यांची न्यायालयीन कोठडी दिल्लीच्या राऊस एव्हेन्यू न्यायालयाने येत्या ९ ऑगस्टपर्यंत वाढवली आहे. या तिघांची न्यायालयीन कोठडीची मुदत आज संपत असल्याने त्यांना व्हिडिओ कॉन्फरन्सिंगच्या माध्यमातून आज न्यायालयात हजर करण्यात आलं. या प्रकरणात  सीबीआयने २९जुलै ला  केजरीवाल यांच्याविरोधात आरोपपत्र दाखल केलं  होतं. तर राऊस एव्हेन्यू कोर्टानं २२ जुलैला के. कविता यांच्याविरुद्ध सीबीआयने दाखल केलेल्या आरोपपत्राची दखल घेतली होती. या प्रकरणात आतापर्यंत १८ जणांना अटक करण्यात आली आहे.

<><><><>

केरळच्या वायनाड जिल्ह्यात काल दरड कोसळल्यानंतर बचावकार्य आजही सुरू आहे. मुंडक्काई परिसरात  मोठ्या प्रमाणावर जीवितहानी झाली

असून अनेक मृतदेह मातीच्या ढिगाऱ्याखाली गाडले गेले आहेत. काही मृतदेह चलियार नदीतून वाहत येत असून ते बाहेर काढण्यात येत आहेत. या दुर्घटनेतल्या मृतांची संख्या १५७ झाली आहे. जखमी झालेल्या १८६ जणांवर विविध रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या दुर्घटनेनंतर १०० जण बेपत्ता झाल्याची माहिती मिळत असून ही संख्या वाढण्याची शक्यता आहे.

केरळचे राज्यपाल आरिफ मोहम्मद खान आणि गोव्याचे राज्यपाल पी. एस. श्रीधरन यांनी आज दुर्घटनाग्रस्त भागाला भेट देऊन पाहणी केली. केंद्रीय मंत्री जॉर्ज कुरियन यांनीही आज घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली तसंच रुग्णालयात जाऊन जखमींची विचारपूस केली.

या दुर्घटनेची माहिती घेण्यासाठी वायनाड इथं जाणाऱ्या केरळच्या आरोग्य मंत्री वीणा जॉर्ज यांच्या गाडीला मलप्पुरम इथं अपघात झाला. या अपघातात जॉर्ज किरकोळ जखमी झाल्या आहेत. त्यांना मंजेरी इथल्या रुग्णालयात दाखल करण्यात आलं.

**<><><><><>**

**तामिळनाडू, पुडुचेरी, कराई कल, केरळ, आणि दक्षिण कर्नाटकात तसंच उत्तराखंड, पंजाब, हरियाणा, चंदीगड, पश्चिम उत्तर प्रदेश, जम्मू-काश्मीर आणि हिमाचल प्रदेश** राज्यांत उद्या अतिवृष्टीचा अंदाज भारतीय हवामान विभागानं  वर्तवला आहे. येत्या ४ ते ५ दिवसांत मान्सून हळूहळू उत्तरेकडे सरकेल असं हवामान विभागानं म्हटलं आहे. **महाराष्ट्रात पुणे, कोल्हापूर, सांगली या जिल्ह्यात पावसाचा जोर कायम आहे. पुणे आणि सांगली** जिल्ह्याच्या विविध भागात सकाळपासून पावसाच्या सरी कोसळत आहेत. सखल भागांमध्ये पाणी भरू लागलं आहे. धरण क्षेत्रामध्ये पाऊस

सुरू असल्याने, दोन्ही जिल्ह्यातल्या नदीकाठच्या लोकांनी सतर्क राहण्याचा इशारा प्रशासनानं दिला आहे.

<><><><><>

जपानच्या टोकियो शहरात काल मध्यरात्रीनंतर पावणेदोनच्या सुमारास भूकंपाचे धक्के जाणवले. रिक्टर मापकावर त्याची तीव्रता ४ पूर्णांक ७ दशांश नोंदली गेली. टोकियो, कानागावा, आणि चिबा या भागात हे धक्के जाणवले. भूकंपात कोणतीही हानी झाल्याचं वृत्त नाही.

<><><><><>

पॅरीस ऑलिम्पिकमध्ये भारताच्या हॉकी संघाने काल आयर्लंडचा २-० असा पराभव करत पदक जिंकण्याची आशा निर्माण केली आहे. तिरंदाजी वैयक्तिक प्रकारात भजन कौर हिनं शानदार खेळाचं प्रदर्शन करत सोळाव्या फेरीत प्रवेश केला, तर अंकिता भकट आणि धीरज बोम्मादेवरा ३२ व्या फेरीतून बाहेर पडले. बॅडमिंटनमध्ये सात्विक साईराज रंकीरेड्डी आणि चिराग शेट्टी या जोडीनं सलग दुसऱ्या सामन्यात विजय मिळवून उपांत्यपूर्व फेरीकडे आगेकूच केली आहे. तर अमित पंघल, जास्मीन लमोबोरिया आणि प्रीती पवार या मुष्टियोद्ध्यांचा पराभव झाल्यानं त्यांच्या पदरी निराशा पडली.

बॅडमिंटनपटू पी. व्ही. सिंधू हिचा ग्रुप स्टेजमधला दुसरा सामना आज इस्टोनियाच्या क्रिस्टिन कुबा हिच्याशी होणार आहे. लक्ष्य सेन याचा सामना जोनातन ख्रिस्टी याच्याशी तर एच. एस प्रणोयचा सामना दूत- फत- ली याच्याशी होणार आहे. धावपटू बलराज पँवर उपांत्यपूर्व फेरीत बाद झाला असून आज तो वर्गीकरण फेरीत खेळणार आहे. नेमबाजी, तिरंदाजी,

बॅडमिंटन, टेबल टेनिस, मुष्टियुद्ध या स्पर्धांमध्ये आज भारतीय खेळाडूंचे सामने होतील.

दरम्यान, भारताची नेमबाज मनु भाकर हिनं काल सलग दुसरं पदक पटकावलं. मिश्र दुहेरीत मनु भाकर आणि सरबजोत सिंग या जोडीनं १० मीटर एअर पिस्टल प्रकारात कांस्य पदक जिंकलं. त्यामुळे एकाच ऑलिम्पिक स्पर्धेत दोन पदकं जिंकणारी मनु भाकर भारताची पहिली खेळाडू ठरली आहे.

//<><><><><>//